**L. A. BILL No. V OF 2022.**

A BILL

FURTHER TO AMEND THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT, THE MAHARASHTRA MUNICIPAL CORPORATIONS ACT AND THE MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, *NAGAR PANCHAYATS* AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965.

**सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५.**

**मुंबई महानगरपालिका अधिनियम, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**(विधानसभेने दिनांक ७ मार्च २०२२ रोजी सुधारणांसह संमत केल्याप्रमाणे.)**

**(विधानपरिषदेने दिनांक ७ मार्च २०२२ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

१८८८ चा ३. १९४९ चा ५९. १९६५ चा महा. ४०.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, मुंबई महानगरपालिका अधिनियम, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यांमध्ये आणखी

सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या त्र्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

प्रकरण एक

**प्रारंभिक**

संक्षिप्त नाव. **१.** या अधिनियमास, मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अधिनियम, २०२२, असे म्हणावे.

प्रकरण दोन

**मुंबई महानगरपालिका अधिनियमाची सुधारणा**

सन १८८८ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम १९ ची सुधारणा. **२.** मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या कलम १९ मध्ये, पोट-कलम (१) मधील, खंड (अ) मध्ये, "राज्य निवडणूक आयुक्त" हा मजकूर जेथे आला असेल त्या दोन्ही ठिकाणी, त्या मजकुराऐवजी, "राज्य शासन, राज्य निवडणूक आयुक्ताच्या मान्यतेने," हा मजकूर, त्याच्या व्याकरणिक फेरबदलांसह दाखल करण्यात येईल. १८८८ चा ३.

प्रकरण तीन

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाची सुधारणा**

सन १९४९ चा अधिनियम क्रमांक ५९ याच्या कलम ५ ची सुधारणा. **३.** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ५ मध्ये, पोट-कलम (३) मध्ये, "राज्य निवडणूक आयुक्त" हा मजकूर जेथे आला असेल त्या दोन्ही ठिकाणी, त्या मजकुराऐवजी, "राज्य शासन, राज्य निवडणूक आयुक्ताच्या मान्यतेने, " हा मजकूर, त्याच्या व्याकरणिक फेरबदलांसह दाखल करण्यात येईल. १९४९ चा ५९.

प्रकरण चार

**महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व**
**औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ याची सुधारणा.**

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम १० ची सुधारणा. **४.** महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५, याच्या कलम १० मध्ये, पोट-कलम (१) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :— १९६५ चा महा. ४०.

"(१) कलम ९ च्या तरतुदींना अधीन राहून,—

(अ) राज्य शासन, राज्य निवडणूक आयुक्ताच्या मान्यतेने, वेळोवेळी, **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, प्रत्येक नगरपालिका क्षेत्रासाठी, असे क्षेत्र ज्या प्रभागामध्ये विभागण्यात येईल त्या प्रभागांची संख्या व विस्तार निश्चित करील :

परंतु, असा कोणताही आदेश प्रसिद्ध करण्यापूर्वी राज्य शासन, राज्य निवडणूक आयुक्ताच्या मान्यतेने, त्याने करण्याचे योजिलेल्या आदेशाचा मसुदा, नगरपालिका क्षेत्रातील सर्व रहिवाश्यांच्या माहितीसाठी, नगरपालिका कार्यालयातील सूचना फलकावर आणि त्यास योग्य वाटेल अशा नगरपालिका क्षेत्रातील इतर ठिकाणी लावण्याची व्यवस्था करील आणि असा आदेश प्रसिद्ध करण्याचा त्याचा इरादा घोषित करणारी नोटीस, त्या क्षेत्रात प्रसारित होणाऱ्या किमान एका वृत्तपत्रात प्रसिद्ध करण्याची व्यवस्था करील आणि पूर्वोक्त आदेशाच्या मसुद्याबाबत ज्यांना आक्षेप दाखल करावयाचे आहेत अशा सर्व व्यक्तींना, नोटीस वृत्तपत्रात प्रसिद्ध केल्याच्या दिनांकापासून सात दिवसांच्या आत, त्यांच्या कारणांसह आक्षेप लेखी सादर करण्याबद्दल कळवील.

(ब) राज्य निवडणूक आयुक्त, ज्यामध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्ग आणि महिला यांच्यासाठी (अनुसूचित जातीच्या, अनुसूचित जमातीच्या व नागरिकांच्या मागासवर्गाच्या महिलांसाठी राखून ठेवलेल्या जागांसह) जागा राखून ठेवलेल्या आहेत असे प्रभाग, **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करील. राज्य निवडणूक आयुक्त, नंतरच्या सार्वत्रिक निवडणुकीकरिता असा कोणताही आदेश संमत करताना, सर्व प्रभागांना अशा आरक्षणाचा लाभ मिळावा यासाठी नगरपालिका क्षेत्रातील निरनिराळ्या प्रभागांमध्ये अशा जागा, आळीपाळीने राखून ठेवलेल्या आहेत, अशी खात्री करील :

परंतु, असा कोणताही आदेश प्रसिद्ध करण्यापूर्वी राज्य निवडणूक आयुक्त, त्याने करण्याचे योजिलेल्या आदेशाचा मसुदा, नगरपालिका क्षेत्रातील सर्व रहिवाश्यांच्या माहितीसाठी, नगरपालिका कार्यालयातील सूचना फलकावर आणि त्याला योग्य वाटेल अशा नगरपालिका क्षेत्रातील इतर ठिकाणी लावण्याची व्यवस्था करील आणि असा आदेश प्रसिद्ध करण्याचा त्याचा इरादा घोषित करणारी नोटीस, त्या क्षेत्रात प्रसारित होणाऱ्या किमान एका वृत्तपत्रात प्रसिद्ध करण्याची व्यवस्था करील आणि पूर्वोक्त आदेशाच्या मसुद्याबाबत ज्यांना आक्षेप दाखल करावयाचे आहेत अशा सर्व व्यक्तींना, नोटीस वृत्तपत्रात प्रसिद्ध केल्याच्या दिनांकापासून सात दिवसांच्या आत, त्यांच्या कारणांसह आक्षेप लेखी सादर करण्याबद्दल कळवील.”.

(शा.म.मु.) एचबी २५७९-२ (२५०—३-२०२२)

प्रकरण पाच

## संकीर्ण

महानगरपालिका, नगरपरिषदा व नगर पंचायती यांच्या क्षेत्रांची प्रभागांमध्ये विभागणी करण्याची प्रक्रिया रद्द करणे.

**५.** मुंबई महानगरपालिका अधिनियम, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (यात यापुढे ज्यांचा निर्देश "उक्त अधिनियम" असा केला आहे) आणि त्याखाली केलेले नियम यांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जेथे मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अधिनियम, २०२२, याच्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वी, राज्य निवडणूक आयुक्ताने, महानगरपालिका, नगरपरिषदा आणि नगर पंचायती यांच्या क्षेत्रांची प्रभागांमध्ये विभागणी करण्याची आणि त्यांच्या हद्दी विनिर्दिष्ट करण्याची प्रक्रिया सुरू केली असेल किंवा पूर्ण केली असेल तेथे, ती प्रक्रिया, रद्द करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल आणि उक्त महानगरपालिकांच्या, नगरपरिषदांच्या व नगर पंचायतींच्या क्षेत्रांची प्रभागांमध्ये विभागणी करण्याची आणि त्यांच्या हद्दी विनिर्दिष्ट करण्याची प्रक्रिया, या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या उक्त अधिनियमांच्या तरतुदींनुसार नव्याने करण्यात येईल.

१८८८ चा ३.
१९४९ चा ५९.
१९६५ चा महा. ४०.
२०२२ चा महा. ....

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५.]**

**[मुंबई महानगरपालिका अधिनियम, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

**[श्री. एकनाथ शिंदे,**
नगर विकास मंत्री.**]**

**[विधानसभेने दिनांक ७ मार्च २०२२ रोजी सुधारणांसह संमत केल्याप्रमाणे.]**

**[विधानपरिषदेने दिनांक ७ मार्च २०२२ रोजी संमत केल्याप्रमाणे.]**

**राजेन्द्र भागवत,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.